सृष्टी की जननी, प्रेमरुप धारिणी,
शक्ति सहारिणी तु नारी सबल कार्यकारिणी ।

# Women Sentiments
# स्त्री संवेदना

वर्ष २०१५-१६



J.T.S.S.P.M.


## SHRI SHIV CHHATRAPATI COLLEGE, JUNNAR

TAL. JUNNAR, DIST. PUNE

ज्ञान-विज्ञान-विमुक्तये
University Grants Commission

## RAJMATA JIJAU WOMEN'S STUDIES CENTRE

Under U.G.C. F-7-63/2009 (WS) New Delhi.
ISBN 978-93-84309-14-5



# स्त्री संवेदना

वार्षिक अंक २०१५-१६


## संपादक मंडळ

अध्यक्ष

**प्रभारी प्राचार्य डॉ.भास्कर शेळके**
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर, जि.पुणे

प्रमुख संपादक

**प्रा.सचिन कसबे**
संचालक, राजमाता जिजाऊ महिला अभ्यास केंद्र

सदस्य

**प्रा.डॉ.सौ.वंदना नढे**

**प्रा.जावेद शेख**

जुन्नर तालुका शिवनेर शिक्षण प्रसारक मंडळ,

# राजमाता जिजाऊ महिला अभ्यास केंद्र

बोडकेनगर, ता.जुन्नर, जि.पुणे

( No.F-7-63/2009(ws)UGC, New Delhi )

## सल्लागार समिती

(सन २०१० पासून)

| | | |
|---|---|---|
| डॉ.भास्कर शेळके (एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.) | ............... | प्रभारी प्राचार्य |
| डॉ.जैनुद्दीन मुल्ला (एम.कॉम.,सी.ए.,एम.फिल,पीएच.डी.) | ............... | उपप्राचार्य |
| प्रा.सचिन कसबे (एम.ए.,एम.फिल.,नेट.) | ............... | संचालक |
| डॉ. दिपेंद्र उजगरे (एम.कॉम.,एम.फिल.,पीएच.डी.) | ............... | सदस्य |
| प्रा.डॉ.सौ.वंदना नढे (एम.ए.,पीएच्.डी.,नेट) | ............... | सदस्या |
| श्रीमती कुसुम बाळसराफ (एम.एस.डब्ल्यू.) | ............... | सदस्या |
| श्रीमती प्रतिभा तांबे (एम.ए.,एम.फिल.) | ............... | सदस्या |
| श्रीमती ॲड.वृषाली वाळुंज (मोरे) (बी.ए.,एलएल.बी.,डीएलएल व एलडब्ल्यू) | ............... | सदस्या |

 ISBN : 978-93-84309-14-5

# अनुक्रमणिका



| क्र. | घटक | लेखिका/लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | वर्तमान पत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्या | | ८ |
| २. | राजमाता जिजाऊ महिला अभ्यास केंद्र अहवाल २०१५-२०१६ | | ९ |
| ३. | लेख / संशोधन पेपर | | |
| | १. दलित कवितेतील स्त्री | डॉ.भास्कर शेळके | १० |
| | २. भारतातील स्त्रियांची सांस्कृतिक प्रगती | श्री.सचिन कसबे | १८ |
| | ३. राजमाता जिजाऊ | प्रा.डॉ.सौ.वंदना नढे | २१ |
| | ४. स्त्रीवादी चर्चाविश्वातील हिंसा-अहिंसा विचाराचे स्वरूप | प्रा.जावेद शेख | २३ |
| | ५. दलित आत्मकथनातील स्त्रीचे स्थान | डॉ.शशिकांत साळवे | २६ |
| | ६. व्यथा एका स्त्रीची | प्रा.कु.रेखा गायकवाड | ३५ |
| | ७. सौंदर्य शाप की वरदान | प्रा.सौ.सुप्रिया काळे | ३७ |
| | ८. स्त्री जीवन-पुरोगामी ते आधुनिक | प्रा.एस.के.कोकणे | ३९ |
| | ९. स्त्री कालची व आजची | प्रा.सौ.एम.डी.हाडवळे | ४१ |
| | १०. महाश्वेता | सुधा मुर्ती | ४३ |
| | ११. माझी आई | प्रविण डमाळे | ४४ |
| | १२. स्त्री शिक्षणाची गरज | छाया लगड | ४५ |
| ४. | कविता- | | |
| | १. सौंदर्य एक शाप का ? | प्रा.सौ.सुप्रिया काळे | २० |
| | २. स्त्री एक शक्ती | सुनिता लवांडे | ३८ |
| | ३. आई | पूनम समुद्र | ३८ |
| | ४. आई | मुक्ता जाधव | ४० |
| | ५. जीवन | प्रियंका घोटकर | ४० |
| | ६. स्त्री-शक्ती | सौ.संजीवनी काळे | ४७ |
| | ७. माऊली | प्रा.सुधीर जोशी | ४७ |
| | ८. संघर्ष | प्रियंका घोटकर | ४७ |
| | ९. बळीचे उपकार | प्रा.सुधीर जोशी | ४८ |
| | १०. आजीच बालपण | विशाल भुरकुंडे | ४८ |
| | ११. आई | ज्योती घोगरे | ४८ |
| | १२. वृध्दत्व | विशाल भुरकुंडे | ४९ |
| | १३. साथ | सोनल भालेराव | ४९ |
| | १४. शाळा | प्रियंका घोटकर | ५० |
| | १५. चारोळ्या-बिरोळ्या | प्रियंका घोटकर | ५० |
| | १६. पाऊस | प्रियंका घोटकर | ५१ |
| | १७. पाऊस | प्रियंका घोटकर | ५१ |

# राजमाता जिजाऊ



प्रा.डॉ.सौ.वंदना नढे, श्री शिव छत्रपती महा., मराठी विभाग, जुन्नर

हिंदवी स्वराज्याचे स्वप्न पाहणाऱ्या व ते प्रत्यक्षात आणण्यास प्रवृत्त करणाऱ्या कर्तबगार राजमाता, राष्ट्रमाता जिजाऊंचे स्थान जनमाणसात अनन्यसाधारण होते आणि आजही आहे.

विदर्भातील वऱ्हाड प्रांतात बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड गावात सन १५७६ मध्ये लखुजी राजांनी आपल्या घराण्याची स्थापना केली. लखुजी जाधव निजामशाहीत आपल्या पराक्रमाने मनसबदारी मिळविणारे व वंशपरंपरेने सिंदखेडचे देशमुखी वतन राजाप्रमाणे सांभाळणारे अत्यंत समर्थ, शूर, श्रीमंत सरदार होते. लखुजींनी फलटणच्या निंबाळकर घराण्यातील म्हाळसाबाई यांच्याशी विवाह केला.

दत्ताजी, अचलोजी, बहादुरजी, राघोजी या चार पुत्रांनंतर या दांपत्याला गुरूवार दि.१२ जानेवारी १५९८ रोजी कन्या झाली. त्यांचे नाव जिजाबाई ठेवण्यात आले. जिजाबाई चारही भावंडाच्या फार लाडक्या भगिनी होत्या.

लहानपणापासून जिजाबाईंवर लखुजी व म्हाळसाबाईंनी सुसंस्कार केले. त्यांनाही इतर भावंडाप्रमाणे लिहिणे, वाचणे, आर्थिक व्यवहार, कला, घोड्यावर बसणे व शस्त्रास्त्रांचे शिक्षण दिले गेले.

जिजाबाईंच्या बालपणीच्या काळात ज्या मराठा राजांनी लढाया केल्या, पराक्रम केले. त्यांनी जो साम्राज्यविस्तार केला. तसेच मुसलमानांनी केलेल्या अत्याचार, जुलूम याचा परिणाम जिजाबाईंच्या बालमनावर झाला. लखुजी राजाच्या दरबारात होणारे न्यायनिवाडे, लष्करी डावपेच, युद्धाची चर्चा या सर्व गोष्टींमुळे जिजाऊ परिपक्व होत होत्या. त्यातच त्यांचा बालविकास होत होता.

त्या काळातील जुन्या रूढी परंपरेमुळे जिजाऊंचा वयाच्या १२-१३व्या वर्षी भोसले घराण्यातील मालोजीराजांच्या पुत्राबरोबर म्हणजे शहाजीराजे यांच्याशी विवाह झाला.

शहाजीराजांनी जिजाबाईंना पुण्याच्या जहागिरीत ठेवले. जहागिरीच्या सर्व व्यवस्थेची जबाबदारी त्यांनी जिजाबाईंवर सोपविली व स्वतः शहाजीराजे कर्नाटकात आदिलशहाच्या सेवेत हजर झाले. अशा या कष्टप्रद वैवाहिक जीवनामुळे जिजाबाईंचा धैर्य व साहस जणू स्वभावगुण बनला.

लहानपणापासून समाजात होणारा स्वधर्माचा व स्त्रियांचा छळ पाहात आल्या होत्या. त्यातच त्यांच्या बंधूंची झालेली हत्या, दूर देशात असलेले पती वियोग, संभाजीचा कपटाने झालेला वध ह्या सर्व घटनांमुळे खचलेल्या जिजाबाई शिवबावर लक्ष केंद्रित करत होत्या. बालशिवाजींना विविध शिक्षणाचे धडे त्या देत होत्या. त्यांना खात्री होती कि, परकीय सत्ता उलटवून लावणारा थोरपुरूष भोसल्यांच्या कुळातच होणार आहे.

समाजातील अशांत वातावरण सुधारण्यासाठी त्यांनी पुण्याच्या जहागिरीत असताना सामान्य जनतेचा न्यायनिवाडा करून त्यांची मने जिंकून घेतली. त्यांना आपलेसे केले. त्यांचा विश्वास संपादन केला. त्याचवेळी स्वधर्माबाबत आदर असणाऱ्या जिजाऊंनी जबरदस्तीने

बाटवलेल्या बजाजी निंबाळकर व नेताजी पालकर यांना शुद्धीकरण करून त्यांना स्वधर्मात घेण्याचा निर्णय घेतला आणि बजाजी निंबाळकरांच्या मुलाला आपली नात देऊन त्यांची त्यांनी सामाजिक प्रतिष्ठा वाढवली.

सामान्य जनतेला अन्यायाविरूद्ध प्रतिकार करण्याची प्रेरणा जिजाऊंनी दिली. तसेच न्यायनिवाड्यात स्वतः बारकाईने लक्ष घालून त्रस्त जनतेला योग्य न्याय मिळवून दिला.

स्वराज्याचे उत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी रयतेला आर्थिक सहाय्य केले. शेतकऱ्यांच्या शेतमालासाठी आवश्यक ती रक्कम कमी व्याजदरात देऊन आर्थिक सहाय्य केले.

जिजाबाईंच्या शिस्तप्रियतेमुळेच शिवाजी महाराजांना आपला लोकसंग्रह करणे सोपे गेले. जिजाबाईंचा उदारपणा व स्वराज्याबाबतचे दूरदर्शीपणाचे धोरण या सर्व गुणांचा पाठपुरावा शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याच्या उभारणीसाठी केला. आलेल्या संकटामुळे न डगमगता मातेच्या पाठिंब्याने शिवाजी महाराजांनी प्रत्येक वेळी संकटावर मात केली. जिजाबाईबाबतची श्रद्धा हीच शिवाजी महाराजांची प्रेरणाशक्ती होती.

जिजाबाईंच्या मार्गदर्शनाने व महाराजांच्या प्रयत्नातून यशस्वीपणे राज्यकारभारास सुरूवात झाली. पती निधनानंतर सती न जाता जिजाबाईंनी स्वतःला कारभारात गुंतवून घेतले. उतारवयात ही त्याचा उत्साह जोरात होता.

अशा या मातेला रायगडावरचे वातावरण सोसवेना म्हणून इ.स.१६६३ मध्ये शिवाजी महाराजांनी रायगडाच्या पायथ्याशी पाचाड येथे स्वतंत्र महल बांधून त्यांच्या व्यवस्थेसाठी स्वतंत्र खाते नियुक्त केले. मोहिमेवर जाता-येता शिवाजी महाराज जिजाऊंचा आशिर्वाद घेऊन जात. त्यांच्या मार्गदर्शनाने व प्रोत्साहनामुळेच महाराज अनेक मोहिमा यशस्वी करू शकले.

जिजाबाईंना शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक व्हावा असे मनोमन वाटे. त्यामुळे हिंदवी स्वराज्याला कायदेशीर सार्वभौमत्व प्राप्त होणार नाही. म्हणून त्यांनी इ.स.१६७४ मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक केला. या सोहळ्यानंतर म्हणजे १२ दिवसांनी बुधवार दि.१७ जून १६७४ मध्ये जिजाऊंनी पाचाड येथील वाड्यात आपले प्राण सोडले.

अशी ही स्वतःच्या पुत्राला घडविणारी, सर्वसामान्यांना आधारभूत ठरणारी, करारी स्वभावाची, स्वराज्याविषयी अभिमान बाळगणारी माणसे जोडण्याची कला असणारी एक महान स्त्री होती.

जिजाबाई या ध्येयनिष्ठ, बुद्धिमान, चतुर, न्यायप्रिय, संयमी, कुशल प्रशासक, अन्यायाला प्रतिकार करणाऱ्या धाडसी, जिद्दी, प्रसंगी कठोर, धार्मिक प्रवृत्तीच्या असूनही अंधश्रद्धाळू नसलेल्या अशा राष्ट्रमाता, राजमाता, लोकमाता होत्या.

म्हणूनच सतराव्या शतकातील जिजाबाईंचे व्यक्तिमत्त्व व कर्तृत्व आजही हिंदुस्तानच्या इतिहासात ठळकपणे दिसून येते.

❖ ❖ ❖ ❖